# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Pali

## Assignment

### Session: 2019-2020

### Subject: Pali Compulsory

BHAGWATI
PAGE NO.:
DATE:

2019 - 2020

Name of Practical

Name => Rupali . S. Ambagade

Std => B.A II Semester

Sub => Pali compulsory

Assighment

Rashmi Narnaware

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

Teacher's Signature

BHAGWATI
PAGE NO.: 1
DATE:

# कपोत जातक

Name of Practical

**संदर्भ :-** कपोत जातक ही आमच्या पालिसाहित्यातील जातक सुत्तपिटकातील जातक या ग्रंथातून घेतलेला आहे. या बोधिसत्वाने कपोत म्हणून जन्म घेतला व आपली पारमिता पूर्ण केल्या.

**स्पष्टीकरण :-** पुढील कथा तथागताने जेतवन विहारामध्ये विहार करताना लोभी भिक्षुंच्या संबंधी सांगितली -

पूर्वी वाराणसीमध्ये ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असताना बोधिसत्व कपोत योनीमध्ये जन्माला आला होता. त्यावेळी वाराणसीतील निवासी लोक कुशल कर्मासाठी ठिक-ठिकाणी पक्ष्यांना सुखपूर्वक निवास करता यावे म्हणून घरटे बांधत होते. वाराणसीतील एका श्रेष्ठीच्या घरकाम करणाऱ्याने स्वयंपाक घरामध्ये एक शिंका बांधलेला होता. बोधिसत्व तेथेच निवास करून वेळ घालवायचा. एक दिवस एका कावळ्याने स्वयंपाक घरावरून जाताना मीठ, तिखट, गोड अशा मत्स्य मांसाची फोडणीचा सुगंध घेऊन त्याला लालूच सुटली आणि तो विचार करू लागला, 'मत्स्य मांस मला कसे मिळेल?' कोठे अंतरावर बसून विचार करीत असतानाच सायंकाळी बोधिसत्वाला स्वयंपाक घरात प्रवेश करताना पाहून विचार केला या

SEAL

Teacher's Signature

Name of Practical

कपोतच्या माध्यमाने (मत्स्य) मत्स्य) मांस) प्राप्त होऊ शकत. दुसऱ्या दिवशी सकाळी धान्य मिळविण्यासाठी जातवेळी तो बोधिसत्वाच्या मागे मागे गेला.

तेव्हा बोधिसत्व (त्याला) 'सौम्य ! तू माझ्यासोबत का बरं फिरत करीत आहेस? विचारले. स्वामी ! मला तुझी (जीवन) चर्या (आचरण) चर्या चांगली वाटते. आता मी तुझी सेवा करीन.' 'सौम्य ! तुझे भक्ष्य चयन काही वेगळे असते आणि माझे काही वेगळे म्हणून तुझ्यासाठी माझ्या सोबत राहणे कठीण होईल. स्वामी ! तुमच्या भक्ष्य शोधण्याच्या वेळी मी सुद्धा आपले खाद्य ग्रहण करून तुमच्या सोबतच परत येईल!' 'ठीक. तुला केवळ प्रमादरहित राहिले पाहिजे.' त्याला उपदेश करून बोधिसत्व आपल्या भक्षणाच्या वेळी तृणबीज खातो आणि कावळा दुसरीकडे जाऊन शेणाच्या गोळ्यातील किडे खाऊन पोट भरल्यावर बोधिसत्वकडे येतो आणि म्हणतो - स्वामी ! तुम्ही खूप वेळपर्यंत (तृणबीज) भक्षण करता तरीही अधिक खाणे योग्य नाही. असे म्हणून बोधिसत्वाकडून भक्ष्य घेऊन सायंकाळी परतल्यावर त्याच्या सोबतच स्वयंपाक घरामध्ये प्रवेश करतो.

स्वयंपाकीने हे पाहिल्यावर की कपोतने एका अन्य प्राण्यालाही आपल्यासोबत आणले आहे म्हणून त्याच्यासाठी सुद्धा एक शिंका तयार करून घरात टांगतो. त्यानंतर दोघेही तिथेच निवास करू लागले. एक दिवस [illegible]साठी पुष्कळ मत्स्य मांस आणले

Teacher's Signature

Name of Practical

गेले. स्वयंपाक्याने स्वयंपाक घरामध्ये इकडे-तिकडे ते टांगले. कावळ्याने ते पाहिल्यानंतर त्याच्या मनामध्ये क्षोभ निर्माण झाला म्हणून तो विचार करू लागला की, "अशा भक्ष्य शोधण्यासाठी न जाता, मला हे मत्स मांस खायचे आहे." रात्रीला अडखळतच लेटून राहिला. दुसऱ्या दिवशी बोधिसत्वाने खाद्य शोधण्यासाठी जा निघाले बोधिसत्व म्हणाले — सौम्य! काक! ये पुढे स्वामी! तुम्ही जा माझे पोट दुखत आहे. सौम्य! कावळ्याला यापूर्वी कधीच पोटात दुखले नाही. ते भुकेने पिडित रात्रीच्या तिन्ही प्रत्येक प्रहरी बेशुध्द होतात. केवळ दिव्याची ज्योत गिळल्यानंतर त्यांनी थोडावेळ तृप्ती झाल्यासारखी वाटते.

तू या मत्स्य मांसाला खाणू इच्छितो, ये मनुष्यांच्या खायच्या वस्तूंना खाणे तुझ्यासाठी अयोग्य आहे." "असे करू नको. माझ्यासोबत खाद्य शोधण्यासाठी चल." "स्वामी नाही येऊ शकत." "ठिक! तर तू आपल्या कर्माला प्रकट करशील लोभाच्या वशीभूत जाऊ नकोस, प्रमाद रहित हो." असा उपदेश देऊन बोधिसत्व खाद्य शोधण्यासाठी निघून गेला. स्वयंपाक्याने वेगवेगळ्या प्रकारचे मत्स्य मांसाचे व्यंजन बनविले आणि वाफ जावी म्हणून गंजावरील झाकण थोडे उघडे केले. कळशीला भांड्यावर ठेवले आणि बाहेर जाऊन अंगावरील घाम पुसत उभा झाला. त्याचवेळी कावळ्याने शिंक्यामधून डोके बाहेर काढले. स्वयंपाक घरात पाहून. स्वयंपाक्याला बाहेर गेलेला पाहून, "आता हे मांस खाण्याची योग्य वेळ आहे. मी मोठे-मोठे मासे की मांसाचे पुरव खाऊ

SEAL

Teacher's Signature

असा विचार करून मांसाचे चूर्ण खाल्ल्याने पोट भरणार नाही म्हणून मांसाचा एक मोठा तुकडा घेऊन शिक्यावर ठेऊन पडल्या-पडल्या खाईल' असा विचार करून शिक्यावरून उडून त्या कळशीवर पोहचला.

कळशीने 'किली किली' आवाज केला. स्वयंपाकी ते शब्द ऐकले आणि हे काय आहे. म्हणून आत प्रवेश केला. त्या कावळ्याला पाहून हा दुष्ट कावळा श्रेष्ठीसाठी मी बनविलेला मांस खाऊ इच्छितो. मी श्रेष्ठीची चाकरी करून आपले जीवनयापन करीत असतो तर या मूर्खाची नाही. मला याचे काय ए. म्हणून दरवाजा बंद करून कावळ्याला पकडून, त्याचे पंख उपटून, कच्चे अद्रक, मीठ आणि जीरे चूर्ण सहित आंबट ताक मध्ये टाकून, त्याला उचलून त्याच्या शिक्यावर फेकले. तो अतिशय गंभीर पीडित होऊन. दुःखाचा अनुभव घेत पडून तडफडत राहीला. बोधिसत्व सायंकाळी परतल्यावर त्याला पीडाग्रस्त पाहून लोभी कावळा, माझे न ऐकले आणि आपल्या लोभामुळे तू या दुःख्यामध्ये विपत्त आहेस. असे म्हणून पुढील गाथा म्हटली-

"जे कुशल इच्छिणारे, हितचिंतकाच्या उपदेशील्यावर, त्या उपदेशानुसार आचरण करीत नाही, त्या कपोताचे वचन न मानल्याने, त्या अमित्राच्या हातामध्ये सापडून दुःख भोगल्याप्रमाणे दुःखी होतो.

बोधिसत्व ही गाथा म्हणून "आता मी या ठिकाणी राहू शकत नाही" असा विचार करून दुसरीकडे निघून जातो.

SEAL

Teacher's Signature

Name of Practical

[redacted] :-

कावळा तिथेच मरतो. तेव्हा स्वयंपाकी त्याला सिक्यासहित उचलून कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर फेकून देतो.

निष्कर्ष :- लालच कधीही करूनये, लालच केल्याचे दुष्परिणाम येथेच भोगावे लागते

Harmawar

SEAL

Teacher's Signature ..........

# उब्बिरीचे रीगाथा

Name of Practical

**संदर्भ :-** उब्बिरीथेरी हा पद्य भाग थेरी गाथा ग्रंथाच ग्रंथातील एक भाग आहे. या मध्ये मुलीच्या मृत्यूमुळे दुःखी झालेल्या उब्बिरीला भगवान बुद्ध उपदेश देऊन तिचे चित्त शांत करतात.

**स्पष्टीकरण :-** उब्बिरी! तू 'अम्म जीवा', 'अम्म जीवा' म्हणून तू वेड्यासारखी जंगला-जंगलामध्ये दुःखाने रडत फिरत आहेस. उब्बिरी! तू स्वतः स्थिर हो. तुझ्या जीवंती नावाच्या चौऱ्यांशी हजार मुली या स्मशानामध्ये जाळल्या गेल्या. तू सांग त्यामधील कोणा त्या जीवंतीसाठी दुःख करीत आहेस?

तथागताचे उपर्युक्त ज्ञान ऐकून उब्बिरीला बोध झाला नंतर ती ध्यानामध्ये लीन झाली असता तीला ज्ञान प्राप्त झाले. ती आपल्या दुःख विमुक्तीची घोषणा करीत म्हणाली.

माझ्या हृदयामध्ये अदृश्य रूपाने लागलेला तीर (बाणाचा) निघालेला आहे. माझ्या मुलीच्या दुःखाने ती संपूर्ण जीवन विषयुक्त बनविले होते आणि माझे प्राण हरण करू इच्छित होते.

आता माझ्यामध्ये ते दुःख राहिले नाही.

SEAL

Teacher's Signature ..............

Name of Practical

आज माझे हृदय नितांत शांत आहे, आकुलता रहित आहे, माझे चित्त निर्मळ आणि शांतिपूर्ण आहे, मी बुद्ध, धम्म आणि संघाचे (हृदयापासून) अनुसरण करून स्वीकार करीत आहे.

निष्कर्ष :- सुकिदरी थेरी गाथे मध्ये आपणास हा बोध होतो कि, भगवंतांच्या करुणामय धम्मामुळे सुकिदरी स्वतःच्या हृदयाचे दुःख दूर करू शकली आणि तिचे चित्त निर्मळ आणि शांत झाले.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Colley
Shch Nagar, Nagpur-15

SEAL

Teacher's Signature